प्रति,
माननीय प्राचार्य,
संलग्नीत महाविद्यालये
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय : PM-USHA (Soft Component) अंतर्गत कार्यक्रम राबविण्याबाबत सूचना.**

महोदय/महोदया,

केंद्र शासनाच्या **PM-USHA (Pradhan Mantri Uchch Shiksha Abhiyan)** अंतर्गत उच्च शिक्षण संस्थांमध्ये गुणवत्ता वृद्धी, कौशल्यविकास, डिजिटल शिक्षण, इनोव्हेशन, संशोधन प्रोत्साहन इत्यादी उद्दिष्टांसाठी विविध **Soft Component कार्यक्रम** राबविणे अपेक्षित आहे.

**आतापर्यंत उत्कृष्ट पद्धतीने राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाबद्दल आपल्या महाविद्यालयाचे मन:पूर्वक आभार.** आगामी काळातही आपण याच उत्साहाने व बांधिलकीने पुढील कार्यक्रम राबवावेत, अशी अपेक्षा आहे.

त्या अनुषंगाने **गोंडवाना विद्यापीठाच्या सर्व संलग्न महाविद्यालयांनी चालू शैक्षणिक वर्षा मध्ये Soft Component अंतर्गत कमीत कमी एक किंवा अधिक विद्यार्थी-केंद्रित कार्यक्रम / वर्कशॉप / सेमिनार / ट्रेनिंग / स्पर्धा / उद्यमिता उपक्रम / ICT आधारित उपक्रम आयोजित करावेत**, अशी विनंती करण्यात येत आहे.

कार्यक्रम राबविताना खालील मार्गदर्शक सूचना अनुसराव्यात:

1. कार्यक्रम PM-USHA Soft Component च्या उद्दिष्टांशी सुसंगत असावा.
2. कार्यक्रम **ऑफलाइन आणि ऑनलाइन** स्वरूपात आयोजित करावे.
3. कार्यक्रमाचा **अहवाल, छायाचित्रे, उपस्थिती नोंद, विद्यार्थी सहभाग तपशील** कार्यक्रमानंतर **७ दिवसांच्या आत** विद्यापीठाकडे पाठवावेत.
4. आवश्यकतेनुसार विद्यापीठाकडून मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाईल (PM-USHA Soft Component समन्वयक डॉ प्रशांत ठाकरे , सहाय्यक प्राध्यापक पदव्युत्तर रसायनशास्त्र विभाग यांचेशी संपर्क साधावा – **What`s Up - 9370310600**).
5. आगामी कार्यक्रमाचा **तारीख पूर्वसूचनेने** कळवावे. (डिसेंबर – २०२५ आणि जानेवारी – फेब्रुवारी – २०२६).

वरीलप्रमाणे कार्यक्रम सातत्याने व प्रभावीपणे राबविण्यात यावेत, ही अपेक्षा आहे.

**डॉ. श्रीराम कावळे**
**(प्र-कुलगुरू)**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

डॉ. श्रीराम श्रा. कावळे
प्र-कुलगुरु
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली